# मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची बुधवार दि. १७/०२/२००९ रोजी झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची ११४ वी अर्थसंकल्पीय बैठक बुधवार दि. १७ फेब्रुवारी २००९ रोजी दुपारी २.०० वा. गृहनिर्माण भवनातील तिस-या मजल्यावरील गुलझारीलाल नंदा सभागृहात संपन्न झाली. सदर बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. आमदार श्री. सचिन अहिर | सभापती |
| २) | मा. श्री. तानाजी सत्रे, भा.प्र.से. | उप सभापती तथा मुख्य अधिकारी |
| ३) | मा.आमदार श्री.बशीर पटेल | सदस्य |
| ४) | मा. श्री. गजेंद्र लष्करी | सदस्य |
| ५) | मा. श्री. नंदकुमार काळे | सदस्य |
| ६) | मा. श्री. कमरुद्दीन मर्चंट | सदस्य |
| ७) | मा. श्री. किसन बा. जाधव | सदस्य |
| ८) | मा. श्री. तारीक फारुकी | सदस्य |
| ९) | मा. श्रीमती सुरेखा पाटील | सदस्या |
| १०) | मा.श्री.सईद खान | सदस्य |
| ११) | मा.श्री.हरिष सणस | सदस्य |
| १२) | मा.श्रीमती उल्का पाटकर | सदस्य |
| १३) | मा.श्री.सुबोध बांदिवडेकर | सदस्य |
| १४) | मा.श्री.व्ही.जी.नायर | सदस्य |
| १५) | मा.श्री.शरद शिरीषकर | सदस्य |
| १६) | श्री.शंकर स.इंगळे, अधिक्षक उपकर निर्धारक व संकलक, म.न.पा. | निमंत्रक |
| १७) | श्री. व्ही.जी.वाणी, निवासी कार्यकारी अभियंता | सचिव |

मा. सभापती यांनी उपस्थित सर्व सन्मा. सदस्यांचे स्वागत करुन सचिव यांना बैठकीचे कामकाज सुरु करण्याच्या सूचना दिल्या. सचिव यांनी उपस्थित सर्व सन्मा.सदस्य व अधिका-यांचे स्वागत करुन बैठकीच्या कामकाजास सुरुवात केली.

**बाब क्रमांक : ११४.१**

अ) विषय- दि. १६/०१/२००९ रोजी झालेंल्या ११३ व्या बैठकिचा कार्यवृतांत स्थायी करण्याबाबात.

---

सदर कार्यवृत्तांत स्थायी करण्यासाठी पृ.क्र.१ ते १७ वर सादर करण्यात आले आहे.

सदर कार्यवृत्तांतावर चर्चा होऊन कार्यवृत्तांतात खालीलप्रमाणे सुधारणा करुन कार्यवृत्तांत स्थायी करण्यात आले.

" पृष्ठ क्र.१७ वर परिच्छेद क्र.२ मध्ये एक महिन्याऐवजी एक वर्ष " वाचावे

**बाब क्रमांक : ११४.२**

विषय - मु.इ.दु.व पु.मंडळाच्या सन २००८-०९ चा सुधारीत व सन २००९-१० चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास मंडळाची मंजूरी मिळणेबाबत.

---

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचा सन २००८-२००९ चा सुधारित व सन २००९-२०१० चा १७ वा अर्थसंकल्प सादर करीत असल्याचे मा. सभापती यांनी जाहीर केले. अर्थसंकल्प सादर करताना मा. सभापती यांनी आपल्या भाषणात सांगितले की, मा. उपसभापती मुख्य अधिकारी यांनी सादर केलेले सन २००९-१० चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक व २००८-०९ चे सुधारित अंदाजपत्रक मुंबई इमारत दुरुस्ती मंडळापुढे मान्यतेसाठी ठेवताना आज आनंद होत आहे.

मंडळाकडून दर वर्षी धोकादायक इमारतींचे सर्वेक्षण केले जात असून २००८ च्या पावसाळापूर्व सर्वेक्षणानुसार धोकादायक इमारतींची संख्या ७९ असून त्यांच्या दुरुस्तीची कार्यवाही चालू आहे.सदर सर्वेक्षणानुसार एकुण १६२५५ उपकर प्राप्त इमारती प्रत्यक्षात अस्तित्वात आहेत. मुंबई बेटावरील उपकर प्राप्त इमारती जवळपास १०० वर्षांपूर्वी बांधलेल्या असल्याने त्यांचे तांत्रिकदृष्ट्या सर्वेक्षण होणे गरजेचे होते. या अनुषंगाने सन २००६ मध्ये मंडळाने आय. आय. टी. मुंबई या संस्थेबरोबर करार केला होता. सदर संस्थेने निश्चित केलेल्या नमुन्यात उपकर प्राप्त इमारतींच्या तांत्रिक सर्वेक्षणाचे काम सुरु झाले आहे. मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने अलिकडेच उपकरप्राप्त इमारतींच्या व्यापक सर्वेक्षणाचे व संगणकीकरणाचे काम हाती घेतले असून त्यासाठी अंदाजपत्रकात भरीव तरतूद केली आहे. सदरचे काम विक्रमी मुदतीत पार पाडण्यात येईल अशी आशा आहे, जेणे करुन यापुढे उपकरप्राप्त इमारतीतील गाळेनिहाय समग्र तपशील सहजगत्या उपलब्ध होईल.

सद्या उपकर प्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीची मर्यादा रु.१२००/- वरुन रु.२०००/- पर्यंत वाढविण्यात आली असल्याने गरजेनुसार आवश्यक त्या इमारतींची दुरुस्तीची कामे हाती घेण्यात येत आहेत.

मुंबई मंडळातर्फे प्रतिक्षा नगर, धारावी,सहकार नगर चेंबूर व कॅनरा इंजिनिअरिंग येथील संक्रमण शिबिराच्या पुनर्वसनाची कामे अंतिम टप्प्यात असून अँटाप हिल,वांद्रे (प.)येथील कामे लवकरच सुरु होतील. शैलेंद्र नगर दहीसर,जुने गोराइ रोड,मागाठाणे बोरीवली,गायकवाड नगर इ.ठिकाणची कामे प्रगती पथावर असून लवकरच मुंबई मंडळाकडून दुरुस्ती मंडळाला पुरेशा संख्येत संक्रमण शिबिरे उपलब्ध करण्यात येतील या व्यतिरिक्त गिरण्यांच्या जमिनीवरसुध्दा इमारती बांधण्यात येत असून त्यामध्येही ६००० ते ६५०० संक्रमण शिबीराचे गाळे उपलब्ध होतील.

मा. सभापती यांनी असे नमूद केले की, कुलाबा संक्रमण शिबीराचे पुनर्वसनाचे काम सुरु करण्यात येत असून यामध्ये संक्रमण गाळे व तेथील रहिवाश्यांना २२५ चौ.फुटाची कायम स्वरुपी घरे देण्याचापण निर्णय घेण्यात आला आहे.

संक्रमण शिबिरातील घुसखोरीचा प्रश्न मंडळाला वारंवार भेडसावत आहे. अलीकडेच मंडळाने घुसखोरांविरुध्द समयबध्द धडक कार्यक्रम यशस्वीरित्या राबविला असून या पुढील

काळात त्यावर परिणामकारक कारवाई होईल अशी आशा आहे. संक्रमण शिबिराच्या व्यवस्थापन सुधारणा व सुरक्षेबाबत अंदाजपत्रकात तरतूद करण्यात आली असून प्रशासन याबाबत ठोस कार्यवाही लवकरच करेल संक्रमण शिबिरातील घुसखोर बाहेर काढण्यासाठी सदर अंदाजपत्रकात विशेष तरतुद करण्यात आली आहे.तसेच भविष्यात घुसखोराना आळा घालण्यासाठी पोलीसांना प्रतिनियुक्तीवर घेण्यासाठीही या अंदाजपत्रकात तरतुद करण्यात आली आहे.

मा.मुख्य अधिकारी तथा उप सभापती यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकातील गोषवा-यानुसार सन २००८-०९ चा मुळ अर्थसंकल्प ९४.४६ कोटी तूटीचा होता. सुधारित अर्थसंकल्पानुसार ही तूट भरुन काढण्यात येऊन सुधारित अर्थसंकल्प रु.६१.५६ कोटी शिलकीचा प्रस्तावित करण्यात आला आहे. सन २००९-१० चा आगामी अर्थसंकल्प रु.१२.४० कोटी तुटीचा आहे. तथापी शासनाकडे असलेल्या उपकर व अंशदानापोटी असलेल्या थकबाकीच्या वसूलीतून ही तूट सहज भरून काढणे शक्य होईल. यावरुन मंडळ अगामी वर्षात अधिक धडाडीने काम करेल असा निष्कर्ष काढता येईल.मंडळातर्फे उपकरप्राप्त इमारतीच्या कलम ३३(७) अंतर्गत पुनर्विकासासाठी नाहरकत प्रमाणपत्र दिले जाते या इमारतीवर पुर्वी दुरुस्तीवर झालेल्या खर्चाची परतफेड नाहरकत प्रमाणपत्रधारकाकडून वसुल करण्यात येते. यासाठी सन २००८-०९ च्या सुधारित अर्थसंकल्पात रु.१.९८ कोटी व सन २००९-१० या वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये रु.२.१५ कोटी ची तरतुद प्रस्तावित करण्यात आली आहे.

मंडळाच्या अर्थसंकल्पात पुढील बाबीना प्राधान्य देण्यात आल्याची बाब प्रशंसनीय असून या मुद्यांच्या उद्दीष्टपूर्तीच्या दृष्टिने आगामी दोन वर्षात भर दिला जाईल अशी त्यांनी अपेक्षा व्यक्त केली.

उपकर प्राप्त इमारतींची माहिती संगणकाच्या माध्यमातून एकत्रित करणे व अशी माहिती वेळोवेळी अद्यावत करणे.संक्रमण गाळयांचे व्यवस्थापन व्यवसायिक संस्थांकडून करणे. संक्रमण शिबिरातील घुसखोरीस प्रतिबंध करणे. मंडळाच्या दैनंदिन कामकाजाबाबतच्या माहितीस प्राधिकरणाच्या वेबसाइटवर ठळक प्रसिध्दी देऊन कामकाजातील पारदर्शकता वाढविणे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अहवाला नुसार, २००८-०९ च्या मूळ अंदाज पत्रकात राज्य शासना कडून रु.४७.५० कोटी उपकरापोटी व रु.५०.०० कोटी अंशदानापोटी प्राप्त होतील असे अपेक्षित होते. आता पर्यंत उपकरापोटी प्राप्त रक्कम रु.२२.३० कोटी व अंशदाना पोटी रु.१९.०० कोटी प्राप्त झाले आहेत. सुधारित अंदाजपत्रकात उपकरापोटी रु.४५.६० कोटी व अंशदानापोटी रु.५०.०० कोटी प्राप्त होतील अशी अपेक्षा आहे. आगामी वर्षात उपकरापोटी रु.४७.५० कोटी व अंशादाना पोटी रु.५०.०० कोटी प्राप्त होतील. म्हाडा अंशदानापोटी रु.१०.०० कोटी प्राप्त होत असले तरी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून गेली चार वर्ष अंशदान प्राप्त न झाल्याने महापालिकेकडे रु.५०.०० कोटीचे अंशदान थकलेले आहे. हे अनुदान लवकरात लवकर प्राप्त करुन घेण्यासाठी महापालीकेकडे वरिष्ठ पातळीवर प्रयत्न करण्यात यावा. त्याचप्रमाणे शासनाकडून येणे असलेली उपकर व अंशदानाची थकीत रक्कम रु.१९२.५१ कोटी प्राप्त करुन घेण्याबाबत मंडळाने सर्वोतपरी प्रयत्न करावेत, जेणकरुन दुरुस्ती व पुनर्रचनेचा कार्यक्रम आगामी काळात मंडळ अधिक गतीमानतेने करु शकेल.

मा. सभापती यांनी अशी सूचना केली की, मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाची प्रतिमा जनमानसात उजळण्यासाठी व कारभारातील पारदर्शकता वाढीस लागण्यासाठी प्रशासनाने कामाच्या गुणवत्तेत व कामाच्या दर्जात वाढ होईल यासाठी कसोशीने प्रयत्न करावा व संगणक क्षेत्रातील आधुनिक तंत्रे आत्मसात करून उपकर प्राप्त इमारती, पुनर्रचित इमारती व संक्रमण शिबीरातील गाळेधारकांच्या अडचणी सोडविण्यासाठी लॅमिनेटेड फोटो पास देणे, एक

खिडकी योजना कार्यान्वित करणे इ.स्वरुपाच्या उपाययोजना अमलात आणाव्यात अश्या सूचना मा. सभापती महोदय यांनी केल्या.

मा. सभापती यांनी भाषणाच्या शेवटी मा.मुख्य अधिकारी तथा उप सभापती यांनी सादर केलेले सन २००८-०९ चे सुधारित अर्थसंकल्प व सन २००९-१० चे वार्षिक अर्थसंकल्प मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ एकमताने मान्य करेल असा विश्वास व्यक्त केला

मा. सदस्य श्री. बशीर पटेल यांनी सादर करण्यात आलेलया अर्थसंकल्पाची प्रत बैठकीपूर्वी २-३ दिवस आधी देण्यात आली असती तर त्यावर काही सूचना करता आल्या असता असे मत व्यक्त केले तसेच उप अभियंत्यांची रिक्त पदे त्वरित भरावीत असे नमूद केले. यावर मा. सभापती यांनी अशी माहिती दिली की, अर्थसंकल्प सादर करणे ही प्रशासकीय बाब असून अर्थसंकल्प हा मंडळासमोर मांडण्याची प्रथा आहे त्यामुळे त्याची प्रत आधी देता येत नाही.

मा. सभापती यांनी अशी सूचना केली, मंडळाचे काम पारदर्शक व गतिमान होण्यासाठी सर्व सन्मा. सदस्यांनी मांडण्यात आलेल्या अंदाजपत्रकावर काही सूचना करावयाच्या झाल्यास त्या स्वागर्ताह राहतील.

मा. सदस्य श्री. जाधव यांनी असे नमूद केले की, मुंबई महानगरपालिकेकडून रु.५०.०० कोटी इतके अंशदान येणे बाकी आहे. तरी ते प्राप्त होण्यासाठी तसेच शासनाकडून उपलब्ध होणारे अनुदान प्राप्त होण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न करावेत, विशेष निधीसाठी रु.७५ लाखाची तरतुद प्रस्तावित असून ती रक्कम कोणाकडून मिळणार आहे त्याचा उल्लेख करण्यात आलेला नाही त्याचा खुलासा व्हावा. प्रत्येक वर्षी जमेच्या बाजूला घट झालेली दिसते व खर्चाच्या बाजूला वाढ झालेली दिसते. सभापती व मा. सदस्य यांच्या बैठकीकरिता रु.२.०० लाखाची तरतुद करण्यात आली आहे. तरी मा. सदस्यांना मिळणा-या भत्यात वाढ करण्यात येणार आहे काय याबाबत उल्लेख नाही. संरचनात्मक दुरुस्तीवर खर्च वाढल्याचे दिसून येते. प्रत्यक्षात पुनर्विकासामुळे खर्च कमी व्हायला हवा. इमारतीच्या टेकू लावण्याच्या खर्चात वाढ झाल्याचे दिसून येते. मंडळ दरवर्षी इमारतींची पुनर्बांधणी करते किंवा कलम ३३ (७) खाली इमारतीच्या पुनर्विकासास परवानगी देते त्यामुळे टेकू लावण्याचा खर्च कमी झाला पाहिजे. संक्रमण शिबीराकरिता सन २००८-०९ करिता रु. १८६७.०० लाखाचा अंदाज केला आहे परंतु संक्रमण शिबीराच्या सुरक्षेकरिता केलेली रु.५०.०० लाखाची तरतुद ही तुटपुंजी वाटते. ती जास्त करण्यात यावी जेणेकरुन घुसखोरीस आळा बसेल व भाडेवसुलीही नियमित होईल. सन २००९-१० च्या अंदाजपत्रकात जमा महसुलीमध्ये वाढ होण्याऐवजी महसुली घट झालेली आहे. तरी भाडेवसुलीवर भर देऊन व महानगरपालिकेकडील अंशदानापोटी देय रक्कमेचा पाठपुरावा करुन सदर तुट भरुन काढण्यात यावी. सन २००९-१० करिता संक्रमण शिबीर व पुनर्रचित इमारतींकरिता भरीव तरतुद करण्यात आली असून मंडळातर्फे नवीन संक्रमण शिबीरांची कामे व पुनर्रचित इमारतींची कामे घेण्यात येणार आहेत का ? याचा खुलासा व्हावा तसेच सहकार कक्ष बंद करण्यात यावा व उपमुख्य अधिकारी (पु.गा.) यांच्या अधिपत्याखाली सहकार कक्षाची कामे करण्यात यावीत त्यामुळे काम सुरळीत तर होईलच व निधीचीही बचत होईल. पुनर्रचना विभागाच्या आस्थापनेवर सन २००९-१० करिता प्रस्तावित करण्यात आलेला खर्च कमी करण्यात यावा तसेच संक्रमण शिबीराकरिता सन २००९-१० करिता रु.२४७.०० लाखाची तरतुद करण्यात आली आहे याचाही खुलासा व्हावा. घुसखोरी काढणे, थांबविणे व भाडेकरुंना वेळेत संक्रमण शिबीर उपलब्ध करुन देण्याच्या कार्यवाहीत तत्परता आणणे जरुरी आहे व भविष्य काळात यामध्ये सुधारणा होईल अशी आशा व्यक्त केली. उपमुख्य अधिकारी (पु.गा.) या विभागाकरिता सन २००९-१० करिता मागील वर्षापेक्षा कमी तरतुद करण्यात आली आहे. त्याबाबतीत त्यांच्याकडील कर्मचारीवर्ग कमी करण्यात आला आहे काय ? मा. मुख्य अधिकारी यांनी उपकरप्राप्त इमारतींचे तांत्रिकदृष्टया सर्वेक्षण करुन माहिती संगणकीकरण करण्याचे चालू

केलेली कार्यवाही स्वागर्ताह असून ती वेळेमध्ये पूर्ण करावी. बांधकाम कार्यक्रमामध्ये सन २००८-०९ मध्ये सुधारित तरतुद रु. ८०९.०० लक्ष्याची करण्यात येऊन त्यामध्ये १७० गाळे बांधले आहेत. तर सन २००९-१० मध्ये रु.२०४१ लाखाची तरतुद करण्यात आली असून ४८६ गाळे बांधण्याचे प्रस्तावित आहे. त्यावरुन २२५ चौ.फू.च्या गाळयाचा दर काढल्यास सन २००९ व सन २०१० करिता येणा-या दरात तफावत दिसून येते. अर्थसंकल्पामध्ये केलेल्या तरतुदींचा व अपेक्षित असलेल्या साध्य यासाठी सर्व अधिकारी व कर्मचारीवर्गाने प्रामाणिकपणे पूर्तता करण्याचा प्रयत्न करावा व मंडळाचे नाव लौकिकास आणावे अशी अपेक्षा व्यक्त केली.

मा. सदस्य श्री. लष्करी यांनी सन २००८-०९ चा सुधारित व सन २००९-१० चा अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक मंडळाच्या बैठकीत मांडल्याबद्दल मा. सभापती व उपसभापती यांचे आभार मानले, उपकरप्राप्त इमारतीतील भाडेकरु/रहिवाशांकडून उपकर वर्षानुवर्षे वसुल करण्यात येतो. याबाबत स्पष्टीकरण करण्यात यावे अशी विनंती केली. उपकरप्राप्त इमारतींच्या तसेच त्यामध्ये राहणा-या भाडेकरुंच्या विम्याबाबत या अंदाजपत्रकात तरतुद नसल्याने ती करण्यात यावी असे नमूद केले.

मा. मुख्य अधिकारी यांनी उपस्थित सर्व सन्मा. सदस्य व अधिका-यांचे स्वागत करुन सन २००८-०९ चे सुधारित व सन २००९-१० चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक मंडळाच्या आजच्या बैठकीत सादर केल्याचे सांगितले. सादर केलेल्या अंदाजपत्रकाबाबत मा. सदस्य श्री. किसन जाधव, श्री. बशीर पटेल व श्री गजेंद्र लष्करी यांनी काही मुद्दे मांडले असून काही सूचना केल्या आहेत. त्या अनुषंगाने खुलासा करताना सांगितले की, मा.सदस्य श्री. बशीर पटेल यांनी सुचीत केल्याप्रमाणे उप अभियंत्यांची रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. उपअभियंत्यांची रिक्त पदे भरण्याकरीता निवड समितीची बैठक घेण्यात आली असून शासनास मान्यतेसाठी प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. प्रस्तावास लवकरच मान्यता अपेक्षित आहे. तसेच दुरुस्तीच्या खर्चाच्याबाबतीत काही प्रमाणात उपमुख्य अभियंता यांना अधिकार प्रदान करण्याबाबत याआधीच प्रस्ताव मंडळासमोर आणण्यात आला होता व त्यावर चर्चा झालेली आहे व पुन्हा सूचना आल्यास त्यावर मंडळाच्या बैठकीत चर्चा करण्यात येईल व तसा प्रस्ताव मंडळाच्या बैठकीत पुन्हा सादर करता येईल.

मा. सभापती यांनी असे निदर्शनास आणून दिले की, मागच्यावेळी प्रस्ताव मंडळाच्या बैठकीत ठेवला होता तेव्हा मा.सदस्यांनी वर्षानुवर्षे चालू असलेली प्रथा आहे त्यानुसार काम करावे असे सुचविले होते. . मा.सदस्य श्री. बशीर पटेल यांनी सदर प्रस्ताव लवकरात लवकर आणण्याबाबत विनंती केली. त्यास अनुसरुन मा. मुख्य अधिकारी यांनी सदर प्रस्ताव मंडळाच्या पुढील बैठकीत ठेवण्यात येईल असे सांगितले.

मा. मुख्य अधिकारी यांनी महसुली जमेमध्ये सन २००५ नंतर काही प्रमाणात कमी वसुली झाल्याचे मान्य करुन महसुली जमेमध्ये वाढ होणार नाही परंतु किमान तेवढी तरी वसुली व्हायला पाहिजे कारण सेवाशुल्क वाढविलेले नाही किंवा कोठल्याही प्रकारचे दर वाढविलेले नाहीत. आहेत तेच दर कायम असल्यामुळे वसुली आहे तेवढीच राहिली आहे. यावर्षी अपेक्षित वसुली ही रु.२०.१० कोटी इतकी असून ती महसुली जमा धरली आहे. जमा धरलेली रक्कम निश्चितपणे वसुल होईल यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येतील असे सांगीतले.

संक्रमण शिबीराच्या खर्चामध्ये गेल्या वर्षीपेक्षा यावर्षी कमी खर्च झालेला आहे. परंतु पुढच्या वर्षीचा खर्चाचा अंदाज दर्शविला आहे तो कुलाबा कफ परेड येथील संक्रमण शिबीराचा पुनर्विकास ग्राहय धरुन दर्शविण्यात आला आहे. कारण सदर संक्रमण शिबीराचे पुनर्विकासाचे काम मुं.इ.दु.व पु.मंडळाकडे आहे.

भाडेवसुली कमी झाल्याबाबत असा खुलासा केला की, सहमुख्य अधिकारी हे पद मागील ६-७ महिन्यांपासून रिक्त होते तसेच भाडेवसुलीकारांची काही पदे रिक्त होती. आता सदर कामामध्ये श्री.कळमपाटील, सहमुख्य अधिकारी लक्ष घालतील व पुनर्रचित व संक्रमण गाळयांची भाडेवसुली निश्चितपणे चांगली होईल याकडे ते लक्ष देतील असा विश्वास व्यक्त केला.

आस्थापनावरील खर्चाबाबत मा. मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, आतापर्यंत सादर करण्यात येणारा अर्थसंकल्प तीन-चार विभागामध्ये करण्यात येत होता परंतु यावेळचे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक विभागून सर्व विभागांसाठी वेगवेगळे बनविण्यात आले आहे. त्यामध्ये प्रत्येक विभागाचा खर्च व जमा वेगवेगळी दाखविण्यात आला आहे. त्यामुळे खर्च व वसुलीवर लक्ष ठेवणे सोपे होणार आहे. प्रत्येक विभागास त्यांच्या विभागासाठी किती खर्च करावयाचा आहे व किती जमा करावयाची आहे याची कल्पना येणार आहे तसेच सहावा वेतन आयोग लागू झाला तर खर्चात वाढ होणार आहे तसेच सर्व पदे भरण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. त्यामुळे आस्थापनेवर तसा खर्च वाढवून दाखविण्यात आला आहे.

मा.सभापती व मा.सदस्यांच्या मानधनाच्या वाढीबाबत मा. मुख्य अधिकारी यांनी असे निदर्शनास आणले की, मानधन शासन ठरवित असल्यामुळे शासनाने मानधनात वाढ केल्यास त्यांना ती मिळेल. मध्यंतरी काही महिने मंडळ अस्तित्वात नसल्यामुळे त्या कालावधीचा खर्च झाला नव्हता. म्हणून तो खर्च कमी दिसत आहे. आस्थापनेवर अनावश्यक खर्च होत नसून अनुज्ञेय आहे तेवढाच खर्च करण्यात येत आहे.

पुनर्रचना विभागातर्फे बांधण्यात येणा-या गाळयांच्या खर्चाबाबत मा. मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, काही पुनर्रचना योजना चालू आहेत, काही योजना चालू होणार असतात, यावर्षात होणारा अपेक्षित खर्च हा फक्त पूर्ण होणा-या इमारतींवरच न होता तो चालू असलेल्या कामांवरही होत असतो. त्यामुळे मा.सदस्य समजतात त्याप्रमाणे प्रति चौ.फू.दराची परिगणना करणे योग्य नाही. यावर्षी होणारा खर्च १७० गाळयांसाठी केला आहे असे होत नाही. तसेच पुढच्या वर्षी प्रस्तावित केलेला खर्च हा फक्त पूर्ण करावयाच्या गाळयांसाठीच होईल असे नाही . होणारा खर्च चालू कामावरचा तसेच स्पील वर्क वरचा असतो.

मा. मुख्य अधिकारी यांनी असे निदर्शनास आणले की, इमारतींची पुनर्रचना करण्याच्या कामात वारंवार अडचणी येत असतात. संपादित केलेल्या मालमत्तेवरील मंडळाने हाती घेतलेली पुनर्रचनेची कामे भाडेकरु थांबवितात व विकासकाकडे जातात. या कारणांमुळे पुनर्रचना विभागाकडून अपेक्षेप्रमाणे काम होताना दिसत नाही ही वस्तुस्थिती आहे. परंतु १-२ इमारतींच्या बाबतीत मा.सदस्यांनी पाठपुरावा करुनही जर पुनर्रचनेचे काम संथगतीने होत असेल तर संबंधित उपमुख्य अभियंता व का.अ. यांनी नोंद घेऊन पुनर्रचनेचे काम वेगाने करावे अशा सूचना दिल्या.

मा. मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, शासनाकडून मंडळास रु.१९२.५१ कोटी व मुंबई महानगरपालिकेकडून अंशदानाचे रु.५० कोटी येणे आहे त्याबाबत पाठपुरावा चालू आहे व शासनाकडून मिळणारे अंशदान मुंबई महानगरपालिकेकडून वसुल केले जाते. वसुल केलेली रक्कम ज्या चलनाने बँकेत जमा केल्या जातात त्या चलनाच्या मुळ प्रती उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाकडून विचारणा करण्यात आली असून यासाठी महानगपालिकेशीही संपर्क साधण्यात आला आहे. मुंबई महानगरपालिकेकडून अंशदानाचे रु.५० कोटी मिळण्यासाठी मा.आयुक्त, म.न.पा. यांना विनंती करण्यात आली होती पुन्हा एकदा विनंती करण्यात येईल.

मा. मुख्य अधिकारी यांनी उपकराबाबत माहिती देताना सांगितले की, कायद्यातील तरतुदीप्रमाणे जोपर्यंत इमारत अस्तित्वात आहे तोपर्यंत उपकर लागू आहे. इमारतीची एकदा

दुरुस्ती केली की, उपकर बंद होतो असे नाही. उपकरातून इमारतीची दुरुस्ती व पुनर्रचना करण्यात येते. जर दुरुस्तीसाठी पैसे कमी पडले तर कोठून आणणार. उपकर हा एकप्रकारे विमा योजनेप्रमाणेच आहे. सर्वांनी पैसे भरावयाचे व सर्व इमारतीची काळजी घ्यावयाची. जो उपकर जमा होतो त्यामधून इमारतींच्या दुरुस्तीची व पुनर्रचनेची कामे हाती घेण्यात येतात.

संक्रमण शिबीरांच्या सुरक्षेविषयी मा. मुख्य अधिकारी यांनी माहिती देताना नमुद केले की, संक्रमण शिबीरासाठी सेक्युरिटी गार्ड नेमलेले नाहीत. परंतु घुसखोरांना बाहेर काढण्यासाठी वाहने, मजूर व मशिनरी भाडयाने घ्यावयाचे प्रस्तावित असून, त्याकरीता तरतुद असली पाहिजे म्हणून त्यासाठी अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात तरतुद करण्यात आली आहे. तसेच पोलीस फोर्स तयार असावा यासाठी पोलीस आयुक्त यांच्याकडून ११ पोलीस अधिकारी / कर्मचारी मागविण्यात आले आहेत. त्यांच्यासाठी वेतन भत्ते द्यावे लागतील यासाठी अंदाजपत्रकात तरतुद करण्यात आली आहे. संक्रमण शिबीरांच्या समस्यांबाबत SITP, पुणे हया संस्थेला अभ्यास करण्याबाबत विनंती करण्यात आली असून संक्रमण शिबीराच्या मॅनेजमेंटबाबत अहवाल मागविण्यात आला होता. त्यांच्याकडून प्रकल्प अहवाल नुकताच मिळाला आहे. त्या अहवालाचा अभ्यास करुन कार्यवाही करण्यात येईल.

मा. मुख्य अधिकारी यांनी संक्रमण शिबीरांच्या पुनर्विकासाबाबत माहिती देताना सांगितले की, फक्त कुलाबा संक्रमण शिबीराचा पुनर्विकास दु.व पु.मंडळाकडून करण्यात येत आहे व बाकी सर्व संक्रमण शिबीरांचा पुनर्विकास मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाकडून करण्यात येत आहे. संक्रमण शिबीरांची मालकी मुंबई मंडळाकडे असल्यामुळे मुंबई मंडळाकडे असलेल्या तरतुदीमधून पुनर्विकासाची कामे करण्यास त्यांनी सुरवात केली आहे. मा. सदस्य श्री. नंदकुमार काळे यांच्या सूचनेप्रमाणे खाजगी विकासकामार्फत संक्रमण शिबीराचा पुनर्विकास केल्यास मंडळास फायदा होऊ शक्तो तसेच केवळ शिर्के कंपनीलाच पुनर्विकासाचे काम न देता इतर संस्थांना देखील पुनर्विकासाचे काम देण्यात यावे या मुद्दयाशी ते सहमत असून त्यांचा हा मुद्दा ते मा. उपाध्यक्ष/ प्राधिकरण यांच्यासमोर मांडतील असे सांगितले. तत्पूर्वी त्यांच्याशी या मुद्दयाबाबत ते सविस्तर चर्चा करतील. असेही मा. मुख्य अधिकारी यांनी सांगीतले.

उपकरप्राप्त इमारतींचे सर्वेक्षण व माहितीचे संगणकिकरण कामाचे आदेश देण्यात आले असून काम लवकरच चालू होईल. या कामासाठी SITP या संस्थेचे मदत घेण्याचे विचाराधिन असून प्रशासकीय कामात पारदर्शकता आणण्याचा प्रयत्न आहे. असे मा. मुख्य अधिकारी यांनी नमूद केले.

विशेष निधीबाबत मा. मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, शासनाकडून प्राप्त झालेला विशेष निधी मंडळाकडे वर्ग झाला आहे तो निधी अंदाजपत्रकात दाखविण्यात आला आहे परंतु नेमकी रक्कम विचारात घेऊन त्याप्रमाणे दुरुस्ती करण्यात येईल.

मा. सभापती यांनी असे निदर्शनास आणले की, ओमकार नांवाची पंतप्रधान अनुदान प्रकल्पाची इमारत कोसळली तेव्हा कोणत्या निधीमधून रहिवाशांना मदत करावयाची असा प्रश्न निर्माण झाला होता. अशीच परिस्थिती १०३-ब खालील सोसायटयांच्या इमारतींच्या बाबतीत उद्भवली तर अशा इमारतींसाठी मंडळातर्फे खर्च करण्याची तरतुद उपलब्ध नसल्यामुळे मंडळ निधी उपलब्ध करुन देऊ शकत नाही. म्हणून विशेष निधीची तरतुद करता येईल का याचा विचार करणे आवश्यक आहे. कारण तरतुद नसताना खर्च केला तर ऑडीट आक्षेप येण्याची शक्यता असते. म्हणून विशेष निधीसाठी तरतुद करण्याचा विचार करावा.

विमा योजनेबाबत मा. मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, विमा योजनेपोटी मंडळास शासनाकडून रु. ६,९५,०००/- मिळतात. हे पैसे जनरल इन्शुरन्स कॉर्पोरेशन या

कंपनिला देण्यात येतात परंतु विम्याची रक्कम मिळण्यासाठी वेळोवेळी कंपनीकडे प्रस्ताव मंजूर करुन घ्यावे लागतात व यामध्ये बराच वेळ जातो आणि कुठली दुर्घटना घडली तर मुख्यमंत्री मदत निधीमधूनच मदत द्यावी लागते. ही योजना बंद करुन मंडळातर्फे वेगळी योजना राबविण्याबाबत प्रस्ताव तयार करुन प्राधिकरणाकडे पाठविण्यात आला होता. त्याबाबत पत्रव्यवहार चालू आहे. सदर प्रस्ताव पुढील बैठकीत आणण्यात येईल. परंतु मा. सदस्य श्री. लष्करी हे एखादी विमा कंपनी अशाप्रकारची जबाबदारी घेण्यास तयार असेल तर त्या विमा कंपनीचे नाव ते सुचविणार होते. म्हणून त्यांच्याकडे काही प्रस्ताव असल्यास त्यांनी तो सहमुख्य अधिकारी यांच्याकडे द्यावा.

वरीलप्रमाणे ~~सविस्तर~~ सविस्तर चर्चेअंती मु.इ.दु.व पु.मंडळाच्या सन २००८-०९ च्या सुधारीत व सन २००९-१० च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली व सदर अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक प्राधिकरणाकडे पाठविल्यानंतर प्राधिकरणाकडून अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास त्वरित मंजूरी मिळेल अशी आशा व्यक्त करुन तशी प्राधिकरणास विनंती करण्यात यावी अशी मा.सभापती यांनी मा.मुख्य अधिकारी यांना सूचना केली.

**ठराव क्रमांक : ११४/१४५**

मु.इ.दु.व पु.मंडळाच्या सन २००८-०९ चे सुधारीत व सन २००९-१० चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक एकमताने मंजूर करण्यात आले व सदर अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक प्राधिकरणाच्या मान्यतेसाठी पाठविण्याचे ठरले.

---------------------------------------------oo---------------------------------------------

बैठकीच्या अखेरीस मा. सभापती यांनी सर्वांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहीर केले.

सचिव/ निबंधक
दु.व पु.मंडळ

मा.मुख्य अधिकारी, मुं.इ.दु.व पु.मंडळ

मा. सभापती, मुं.इ.दु.व पु.मंडळ